**महाराष्ट्र नगरपरिषद कर्मचारी संवर्गाबाबत समावेशन झालेल्या नगरपरिषद कर्मचा-यांना व भविष्यात सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देणेबाबत.. ..**

क्र.न.प.प्र.सं/कक्षा-०५/वैद्य.ख.प्रति/कर्म.संवर्ग/२०१३
नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३रा मजला सर पोचखानवाला रोड,
वरळी, मुंबई ४०० ०३०.
दिनांक : - ०७ जानेवारी २०१३

परिपत्रक

महाराष्ट्र शासनाने अधिसुचना क्र.एमसीओ-१२०३/१२४६/सीआर-१७५/०३/युडी-१४ दि.११/२/२००७ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम राज्य सेवा (समावेशन, सेवा प्रवेश व सेवाशर्ती ) नियम २००६ व सुधारीत अधिसूचना दि.२८.०१.२०१० अंतिमत: प्रसिध्द केलेले आहेत.

०२. उक्त संवर्ग सेवा-शर्ती नियमातील तरतूदीनुसार पात्र ठरलेल्या नगरपरिषद कर्मचा-यांचे विविध संवर्गात समावेशन केलेले आहे. तसेच सामवेशनानंतर संवर्गातील उर्वरित रिक्त पदावर सरळसेवेने कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहे.

संवर्ग सेवा-शर्ती नियमातील तरतूदीनुसार विविध संवर्गात समावेशन झालेल्या काही नगरपरिषद कर्मचा-यांनी आपल्या वैद्यकीय रक्कमेची प्रतिपूर्ती शासनाकडून मिळावी अशी विनंती या संचालनालयास केलेली आहे.

०३. नगरपरिषद कर्मचारी राज्यस्तरीय संवर्गातील कर्मचा-यांच्या वैद्यकीय रक्कमेची प्रतिपूर्ती मिळणेबाबत नमूद करण्यात येते की, शासनाने संवर्ग सेवा-शर्ती नियम, २००६ दि.११.०२.२००७ व सुधारीत अधिसूचना दि.२८.०१.२०१० अंतिमत: प्रसिध्द केलली आहे. या संवर्ग सेवा-शर्ती नियमातील तरतूदीनुसार, ज्या पात्र नगरपरिषद कर्मचा-यांचे या संवर्गात अंतिम समावेशन आदेश व त्यानुसार संवर्गातील रिक्त पदांवर पदस्थापना संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी दिलेली आहे, तसेच भविष्यात संवर्गच्या रिक्त पदावर सरळसेवेन नियुक्त होणा-या कर्मचा-यांना नियमित शासकीय कर्मचारी म्हणून गणन्यात येणार असून, शासकीय कर्मचा-यांप्रमाणे सेवेचे सर्व लाभ अनुज्ञेय आहेत.

या संवर्ग कर्मचा-यांना विविध नगरपरिषदांमध्ये संवर्ग पदावर पदस्थापना दिलेली आहे व भविष्यात सरळसेवेने नेमणूक झालेले कर्मचा-यांनाही संवर्ग पदावर नेमले जाणार आहे. संबंधित नगरपरिषदमध्ये पदस्थपना/नेमणूका झाल्यानंतर या संवर्ग कर्मचा-यांना वेतन, भत्ते व त्या अनुषंगाने इतर लाभ नगरपरिषदेच्या फंडातून करण्यात येणार आहे.

०४. सर्व नगरपरिषदांमधील मुख्याधिका-यांना सूचीत करण्यात येते की, महाराष्ट्र नागरी सेवा (वैद्याकीय परिचर्या) नियम १९६१ मधील तरतूदीचे पालन करुन संवर्गात समावेशन झालेल्या नगरपरिषद कर्मचा-यांना व भविष्यात सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना किंवा त्यांच्या कुटूंबियांच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती संबंधित नगरपरिषदेच्या नगरपरिषद निधीतून, या संदर्भात अस्तित्वात असलेल्या सर्व वित्तिय नियमांचे पालन करुन प्रतिपूर्ती करुन घेण्याची दक्षता घ्यावी.

(ए. एल. जऱ्हाड )
आयुक्त तथा संचालक